• वर्ष : ०४ • अंक : ०२१ • पुणे • बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



# भारतीय रणरागिणींची 'सुवर्णदौड'!







## बहरीनला धूळ चारत जिंकले ऐतिहासिक गोल्ड मेडल
### अटीतटीच्या लढतीत भारतीय चौकडीचा थरार

**नागोया (दै. आरंभ पर्व)**

'आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६' च्या ॲथलेटिक्स ट्रॅकवर अखेरच्या दिवशी भारतीय महिलांनी ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. महिलांच्या ४x४०० मीटर रिले शर्यतीत भारतीय चौकडीने अप्रतिम समन्वय व कौशल्याचे प्रदर्शन करत सुवर्णपदकाला गवसणी घातली. चालू आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे हे एकंदर सहावे सुवर्णपदक ठरले असून, यंदाच्या ॲथलेटिक्स मोहिमेतील भारताचे हे पहिले आणि एकमेव सुवर्णपदक आहे.

किरण पाहल, मचेतिरा पूवम्मा (एम. आर. पूवम्मा), प्राची आणि विथ्या रामराज या भारतीय चौकडीने ३ मिनिटे २९.६९ सेकंद अशी सर्वोत्तम वेळ नोंदवत भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. या शर्यतीत भारताने बहरीन आणि चीनच्या कडव्या आव्हानावर मात केली.

- **भारत (सुवर्णपदक): ३ मिनिटे २९.६९ सेकंद**
- **बहरीन (रौप्यपदक): ३ मिनिटे ३०.२१ सेकंद**
- **चीन (कांस्यपदक): ३ मिनिटे ३१.०२ सेकंद**

शर्यतीची सुरुवात भारतासाठी काहीशी सावध आणि संथ झाली. पहिल्या टप्प्यात किरण पाहल धावताना पिछाडीवर पडल्याने बॅटन हस्तांतरित करताना भारतीय संघ तिसऱ्या स्थानावर फेकला गेला होता. मात्र, दुसऱ्या टप्प्यात अनुभवी धावपटू मचेतिरा पूवम्माने उत्कृष्ट वेग पकडत भारताला आघाडीच्या शर्यतीत पुन्हा आणून ठेवले. तिसऱ्या टप्प्यात प्राचीने ही आघाडी टिकवून ठेवत शेवटच्या टप्प्यासाठी विथ्या रामराजकडे बॅटन सोपवले.

अंतिम टप्प्यात रोमांच शिगेला पोहोचला होता. बहरीनची जागतिक कीर्तीची स्टार धावपटू सलवा ईद नासेर अत्यंत वेगाने भारताचा पाठलाग करत जवळ पोहोचली होती. परंतु, अखेरच्या १०० मीटरमध्ये विथ्या रामराजने आपली सर्व शक्ती पणाला लावली, वेग कायम राखला आणि अवघ्या ०.५२ सेकंदांच्या फरकाने बहरीनला मागे टाकत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

### विथ्या रामराजची स्वप्नवत कामगिरी

विथ्या रामराजसाठी ही स्पर्धा अत्यंत संस्मरणीय ठरली आहे. तिने याआधी पी. टी. उषा यांचा ४०० मीटर अडथळा शर्यतीचा प्रदीर्घ विक्रम मोडून क्रीडा जगताचे लक्ष वेधून घेतले होते. आता ४x४०० मीटर रिलेमधील या सुवर्णपदकासह तिने चालू स्पर्धेत आपले तिसरे वैयक्तिक/सांघिक पदक निश्चित केले आहे.

### रिले शर्यतीत भारताचे ऐतिहासिक वर्चस्व

महिलांच्या ४x४०० मीटर रिले प्रकारात आशियाई स्तरावर भारताचा ऐतिहासिक दबदबा राहिला आहे. २००२ च्या बुसान स्पर्धेपासून आतापर्यंत झालेल्या सलग ७ आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताचे हे सहावे सुवर्णपदक ठरले आहे. मागील हांगझोऊ स्पर्धेत बहरीनने बाजी मारल्याने भारताला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते; मात्र नागोयामध्ये भारतीय महिलांनी गत पराभवाची परतफेड करत पुन्हा एकदा आशियाई चॅम्पियन होण्याचा मान मिळवला.

ॲथलेटिक्स प्रकारातील भारताची २०२६ मधील मोहीम १ सुवर्ण, ९ रौप्य आणि १४ कांस्य अशा एकूण २४ पदकांसह समाप्त झाली. मागील हांगझोऊ स्पर्धेतील ६ सुवर्णपदकांच्या तुलनेत यंदा सुवर्णाची संख्या घटली असली, तरी महिला रिले संघाने शेवटच्या दिवशी भारताची सुवर्णपदकाची प्रतीक्षा संपुष्टात आणली. महिलांच्या सुवर्णयशाव्यतिरिक्त रिले ट्रॅकवर भारताला इतर दोन स्पर्धांमध्येही पदके मिळाली.

पुरुष ४x४०० मीटर रिले: भारतीय संघाने चुरशीच्या लढतीत कांस्यपदक पटकावले. या संघात मनू टी. आणि विशाल टी. के. यांनी शानदार कामगिरी केली. या शर्यतीत जपानने सुवर्ण तर कतारने रौप्यपदक पटकावले. ४x४०० मीटर मिश्र (मिक्स्ड) रिले: भारतीय संघाने तिसऱ्या स्थानी फिनिश करत कांस्यपदकाची कमाई केली.

## भरती गैरव्यवहार प्रकरणात राजेंद्र खेडेकरला अटक
### पुणे महापालिकेत विविध पदांवर नोकरीचे आमिष दाखवून अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेत विविध पदांवर नोकरीचे आमिष दाखवून अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी जेजुरी येथील मार्तंड देवस्थानचा विश्वस्त राजेंद्र खेडेकरला शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे. भरती गैरव्यवहार प्रकरणात सहभागी आरोपींनी चौदाहून अधिक उमेदवारांना बनावट नियुक्तीपत्रे देऊन त्यांची पावणेतीन कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

या गुन्ह्यात खेडेकर याच्यासह महापालिकेच्या शिक्षण विभागातील शिपाई शिवानंद बाळासाहेब पाटील आणि अन्य आरोपींविरोधात शिवाजीनगर आणि भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत, महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधीक्षकांनी तक्रार दिली आहे.




हा प्रकार मे २०२२ ते मे २०२५ या कालावधीत महापालिकेच्या परिसरासह इतर ठिकाणी घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. आरोपींनी बेरोजगारांना पालिकेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. आरोपींनी आपसांत संगनमत करून महापालिकेचे बनावट लेटरहेड, शिक्के आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्यांचा वापर करून बोगस नियुक्तीपत्रे तयार केली.

त्यांनी उमेदवारांना बनावट नियुक्तीपत्रे, ओळखपत्रे, सेवा पुस्तिका, वैद्यकीय प्रमाणपत्रे आणि पगाराच्या पावत्याही दिल्या; इतकेच नव्हे तर उमेदवारांचा विश्वास बसावा यासाठी त्यांच्या बँक खात्यात पगार जमा झाल्याचे दाखविले, असे तक्रारींमध्ये नमूद आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर खेडेकर पसार झाला होता. त्याने अटकपूर्व जामिनासाठी पुणे सत्र न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, न्यायालयाने हा अर्ज फेटाळला होता.

नोकर भरतीचा सुनियोजित घोटाळा हा मोठ्या संघटित कटाचा भाग असून, त्यामुळे सरकारी भरती प्रक्रियेवरचा सर्वसामान्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे; तसेच अनेक बेरोजगार व्यक्तींचे आर्थिक नुकसान झाले आहे. आरोपांचे स्वरूप व गांभीर्य, आरोपींचा प्राथमिक सहभाग व भूमिका, तपासाची सद्यःस्थिती आणि व्याप्ती व आरोपीच्या पोलिस कोठडीतील चौकशीची आवश्यकता लक्षात घेता आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर करता येणार नाही, असे न्यायालयाने दिलेल्या आदेशात म्हटले होते.

गुन्ह्याच्या पुढील तपासासाठी न्यायालयाने खेडेकरला तीन ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याच्या तपासाची व्याप्ती लक्षात घेत न्यायालयाने आरोपीला पोलिस कोठडी सुनावल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीश दिघावकर यांनी दिली.

## दिवेघाटातील वाहतूक बुधवारी दोन तास बंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर ते दिवेघाट दरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. या कामासाठी दिवेघाट परिसरात बुधवारी (ता. ३०) 'ब्लास्टिंग' (दगड फोडण्यासाठीचा स्फोट) करण्यात येणार आहे. या तांत्रिक कामामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून दुपारी १२ ते दुपारी दोन वाजेपर्यंत दिवेघाटातील सर्व प्रकारची वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलेल्या सूचनेनुसार, रस्ता रुंदीकरणासाठी घाटातील कडे कापण्याचे काम सुरू असून त्यासाठी हा ब्लास्टिंगचा निर्णय घेण्यात आला आहे. दुपारी दोन तास हा मार्ग बंद राहणार असल्याने या कालावधीत प्रवाशांनी आणि वाहनचालकांनी दिवेघाटाऐवजी इतर पर्यायी मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी या तात्पुरत्या बदलाची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक पोलिस उपायुक्त आणि महामार्ग प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर दुपारी दोन वाजल्यानंतर या मार्गावरील वाहतूक नेहमीप्रमाणे पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे.

## आरटीई प्रवेशासाठी खोटे रहिवासी पुरावे सादर केल्याचा आरोप; १४ पालकांवर गुन्हा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत आपल्या पाल्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी खोटे अथवा दिशाभूल करणारे रहिवासी पुरावे सादर केल्याच्या आरोपावरून खेड तालुक्यातील १४ पालकांविरुद्ध खेड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी खेडचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार मार्च २०२६ ते मे २०२६ या कालावधीत राजगुरूनगर येथील पंचायत समितीच्या तालुका स्तरावरील आरटीई प्रवेश समितीकडे संबंधित पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या इयत्ता पहिलीतील प्रवेशासाठी रहिवासी पत्त्याची कागदपत्रे सादर केली होती. या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या पाल्यांना आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल (आळंदी, ता. खेड) आणि पोदार इंटरनॅशनल स्कूल (आंबेठाण, ता. खेड) येथे प्रवेश मिळवून देण्यात आले. मात्र त्यानंतर प्रवेशासाठी सादर




केलेल्या रहिवासी पुराव्यांमध्ये नमूद असलेल्या पत्त्यावर संबंधित पालक प्रत्यक्षात राहत नसल्याचे निदर्शनास आले. म्हणून प्रशासनाची दिशाभूल करून संबंधित पालकांनी आरटीईच्या माध्यमातून आपल्या पाल्यांसाठी प्रवेश मिळविल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गटशिक्षणाधिकारी जंगले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून खेड पोलीस ठाण्यात संबंधित पालकांवर फसवणुकीचा आणि खोटे कागदपत्र सादर केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राऊळ करीत आहेत.

# कचरा समस्येवर पालिकेचा कानाडोळा

संपादकाय — विचार आजचा... दिशा उद्याची...

**पुणे शहराची ओळख शिक्षणाचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी आणि झपाट्याने विकसित होणारे महानगर अशी आहे. मात्र, या शहराच्या प्रगतीला कचऱ्याची समस्या मोठा डाग लावत आहे. शहरातील अनेक भागांत रस्त्याच्या कडेला, चौकांमध्ये, मोकळ्या जागांमध्ये तसेच नदी-नाल्यांच्या परिसरात कचऱ्याचे ढीग दिसत असतील, तर शहराच्या स्वच्छतेबाबत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.**

कचरा निर्माण होणे ही शहरी जीवनातील अपरिहार्य बाब आहे; परंतु त्याचे योग्य संकलन, वर्गीकरण, वाहतूक आणि शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची मूलभूत जबाबदारी आहे. नागरिकांकडून कर वसूल करूनही त्यांना स्वच्छ आणि आरोग्यदायी परिसर मिळत नसेल, तर प्रशासनाच्या कामकाजाचे परीक्षण होणे आवश्यक आहे.

कचऱ्याचा प्रश्न केवळ शहराच्या सौंदर्याशी संबंधित नाही. कचरा वेळेवर उचलला गेला नाही, तर दुर्गंधी, डास-माशांचा प्रादुर्भाव, भटक्या प्राण्यांचा त्रास आणि विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. पावसाळ्यात कचरा नाल्यांमध्ये गेल्यास पाण्याचा निचरा अडतो आणि तुंबलेल्या नाल्यांमुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे कचरा व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे नागरिकांच्या आरोग्याशी आणि सुरक्षिततेशी तडजोड करणे होय.

महत्त्वाचे म्हणजे, केवळ कचरा उचलण्यासाठी वाहने वाढवणे किंवा अधूनमधून स्वच्छता मोहीम राबवणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. घराघरातून ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे गोळा होतो का, त्याचे पुढे योग्य वर्गीकरण होते का, कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता पुरेशी आहे का, कचरा वाहतुकीवर नियंत्रण आहे का आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर सातत्याने कारवाई होते का, या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने नागरिकांसमोर स्पष्टपणे ठेवली पाहिजेत.

दुसरीकडे, नागरिकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणे, कचरा जाळणे किंवा घरातील कचरा रस्त्याच्या कोपऱ्यावर टाकणे ही प्रवृत्ती थांबली पाहिजे. मात्र नागरिकांनी नियम पाळावेत अशी अपेक्षा करताना प्रशासनानेही नियमित आणि विश्वासार्ह कचरा संकलनाची व्यवस्था उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नागरिक आणि प्रशासन यांच्यातील परस्पर जबाबदारीतूनच स्वच्छ शहराची निर्मिती होऊ शकते. पुणे महानगरपालिकेने कचरा व्यवस्थापनासाठी केवळ कागदावरील योजना आणि घोषणांवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष परिणाम दिसेल अशी व्यवस्था उभी करण्याची गरज आहे. प्रत्येक प्रभागातील कचरा संकलनाची नियमितता, कचऱ्याचे प्रमाण, प्रक्रिया केलेल्या कचऱ्याचे प्रमाण आणि तक्रारींचे निराकरण याची पारदर्शक माहिती नागरिकांसमोर ठेवली गेली पाहिजे.

पुणेकरांना स्वच्छ शहर देणे ही कोणत्याही एका अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची जबाबदारी नाही; ती संपूर्ण यंत्रणेची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र या यंत्रणेचे नेतृत्व करणाऱ्या प्रशासनाने समस्येकडे कानाडोळा करून चालणार नाही. कचऱ्याचे ढीग दिसत असताना त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे समस्या संपली असे समजणे नव्हे.

**पुणे शहराचा विकास केवळ उंच इमारती, रुंद रस्ते आणि मोठ्या प्रकल्पांनी मोजला जाऊ नये. शहर किती स्वच्छ, आरोग्यदायी आणि नागरिकांसाठी राहण्यायोग्य आहे, यावरही त्याची खरी प्रगती ठरते. त्यामुळे आता घोषणांपेक्षा कृती आणि मोहिमांपेक्षा सातत्यपूर्ण व्यवस्थापनाची गरज आहे. पुणे महानगरपालिकेने कचरा प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून नागरिकांना दिलासा द्यावा, हीच अपेक्षा.**

# विजयस्तंभाच्या विकासासाठी पीएमआरडीएकडे निवेदन

## राष्ट्रीय स्मारकाच्या विकास आराखड्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भीमा कोरेगाव विजयस्तंभ राष्ट्रीय स्मारकाचा विकास आराखडा मंजूर करून त्या ठिकाणी लवकरात लवकर भव्य स्मारक उभे करावे, या मागणीसाठी भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक समितीच्या वतीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

येत्या १ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभाला ऐतिहासिक भेट दिल्या घटनेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून या ठिकाणी तातडीने काम सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी व्यक्त केले.

तसेच स्मारकाच्या कामासाठी आवश्यक असणारा विकास आराखडा व आरक्षण तातडीने मंजूर करावे, अशी आग्रही भूमिका त्यांनी आयुक्तांसमोर मांडली. दरम्यान, शासनाने गेल्या पाच ते सात वर्षांपासून या स्मारकासाठी १०० कोटी रुपयांची भरघोस तरतूद केलेली आहे. मात्र, प्रशासकीय उदासिनतेमुळे अद्यापपर्यंत या निधीतील एकही रुपया प्रत्यक्ष कामावर खर्च झालेला नाही, ही अत्यंत खेदजनक आणि प्रशासकीय नामुष्की आहे, अशी तीव्र भावना भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक समितीचे राहुल डंबाळे यांनी व्यक्त केली. आता कोणतीही तांत्रिक सबब न सांगता स्मारकाचे काम गतीने पुढे न्यावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे नेते अशोक कांबळे यांनीही आंबेडकरी जनतेच्या भावना व्यक्त केल्या. भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक हे संपूर्ण आंबेडकरी जनतेच्या अस्मितेचे आणि प्रेरणेचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रशासनाने आता अधिक वेळ न घालवता या ठिकाणी प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सादर करण्यात आलेल्या निवेदनाची दखल घेत PMRDA आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

त्यांनी या निवेदनाला अनुषंगून तात्काळ कारवाई करण्याबाबतच्या सूचना संबंधित प्रशासकीय विभागाला दिल्या आहेत. तसेच, हे राष्ट्रीय स्मारक शक्य तितक्या लवकर उभारण्यासाठी प्रशासकीय पातळीवर सर्व आवश्यक ते प्रयत्न केले जातील, असे स्पष्ट आश्वासन त्यांनी यावेळी शिष्टमंडळाला दिले.

या शिष्टमंडळाने आयुक्तांशी सकारात्मक चर्चा केली असून, प्रशासनाने यावर तातडीने पावले उचलावीत अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### भारतीय स्वयंपाकघरातील पारंपरिक स्वयंपाकाला आधुनिकतेची जोड

पुणे (आरंभ पर्व) : जगभरातील हाऊसवेअर क्षेत्रातील प्रसिद्ध ब्रँड ट्रामॉन्टिनाने भारतीय स्वयंपाकघरातील गरजा लक्षात घेऊन 'हेरिटेज आयर्न' ही आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कुकवेअर श्रेणी सादर केली आहे. भारतीय स्वयंपाकपद्धतीमध्ये लोखंडी कुक्वेअर पारंपरिक महत्त्व आहे. टिकाऊपणा, उष्णता टिकवून ठेवण्याची क्षमता आणि विविध प्रकारच्या पदार्थांसाठी उपयुक्तता यामुळे भारतीय स्वयंपाकघरांमध्ये आजही महत्त्वाचे स्थान आहे. तवा, कढई, अप्पेचट्टी यांसारखी लोखंडी भांडी आजही अनेक भारतीय स्वयंपाक घरांमध्ये वापरली जातात. मात्र, बदलत्या जीवनशैलीनुसार ग्राहकांना पारंपरिक गुणांसोबतच हाताळण्यास सुलभ, अधिक टिकाऊ आणि आधुनिक स्वरूपातील कुकवेअरची अपेक्षा आहे. पारंपरिक लोखंडी भांड्यांची स्वयंपाकातील कार्यक्षमता कायम ठेवत त्यामध्ये अधिक टिकाऊपणा, वापरातील सुलभता आणि आधुनिक डिझाइनचा समावेश या श्रेणीत करण्यात आला आहे.

### उरुळी कांचनमध्ये अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : उरुळी कांचन शहरातील अंतर्गत रस्त्यांवर सातत्याने होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून, या समस्येबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत वाहनांची वाढती संख्या, रस्त्याच्या कडेला होणारी अनियमित पार्किंग तसेच वाहतुकीच्या नियोजनाचा अभाव यामुळे कोंडीची समस्या अधिक तीव्र होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या वाहतूक कोंडीचा परिणाम दैनंदिन प्रवास करणारे नागरिक, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्णवाहिका आणि आपत्कालीन सेवांवरही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांनी योग्य समन्वय साधून वाहतूक कोंडीच्या ठिकाणांचा आढावा घेणे गरजेचे आहे. वाहतूक नियोजन, अनधिकृत पार्किंगवर नियंत्रण, आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नियुक्ती तसेच अंतर्गत रस्त्यांवरील वाहतुकीसाठी योग्य नियोजन करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

### १९४ एकरांवर विकसित करणार अल्ट्रा-लक्झरी फार्महाऊस प्रकल्प

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट कंपन्यांपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबलने गुरुग्राम वेस्ट (फर्रुखनगर) परिसरात प्रवेशाची घोषणा केली आहे. कंपनी १९४.२२ एकर क्षेत्रात अल्ट्रा-लक्झरी फार्महाऊस व्हिलांचा विशेष प्रकल्प विकसित करणार असून, हा प्रकल्प निवडक ग्राहकांसाठी कमी घनतेचा (लो-डेन्सिटी) आणि अत्यंत खासगी निवासी परिसर म्हणून उभारण्यात येणार आहे. याबाबत सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडचे संस्थापक आणि अध्यक्ष प्रदीप अग्रवाल म्हणाले, "फर्रुखनगर परिसरावर आमचे बऱ्याच काळापासून लक्ष होते. द्वारका एक्सप्रेसवे आणि KMP एक्सप्रेसवेच्या जवळ असल्यामुळे तसेच मोठ्या प्रमाणात उपलब्ध खुल्या जमिनीमुळे येथे लक्झरी जीवनशैलीचा नवा अनुभव निर्माण करण्याची संधी आहे. हा केवळ निवासी प्रकल्प नसून, निवडक ग्राहकांसाठी गोपनीयता, हरित वातावरण आणि उत्कृष्ट जीवनशैलीचा अनुभव देणारा एक अनोखा प्रकल्प असेल. गुरुग्रामच्या या भागातील वेगाने विकसित होणाऱ्या पायाभूत सुविधांमुळे फर्रुखनगर भविष्यात अल्ट्रा-लक्झरी निवासासाठी एक महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे." या प्रकल्पासाठी कंपनीने २५ एकर जमीन खरेदी केली असून, अतिरिक्त १६९.२२ एकर जमिनीसाठी सहकार्य करार (कोलॅबोरेशन ॲग्रीमेंट) केला आहे.

# जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धेसाठी आता फक्त ५ दिवस शिल्लक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सवातील कला, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा डिजिटल माध्यमातून जगभर पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित 'जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धा २०२६'साठी आता फक्त ७ दिवस शिल्लक आहेत. स्पर्धेची अंतिम मुदत वाढविण्यात आली असून ४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत रील सादर करता येणार आहे. 'जागर कलेचा, समृद्ध परंपरेचा..!' या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा महाराष्ट्रासह भारत आणि जगभरातील स्पर्धकांसाठी खुली आहे. स्पर्धेत 'नैवेद्य आणि परंपरा', 'गणराज रंगी', 'कलाधिपती गणपती', 'शब्दसुमनांकित गणराय' आणि 'AI मधून गणपतीचे नवदर्शन' अशा पाच विभागांचा समावेश आहे. AI-निर्मित किंवा AI-सहाय्यित सामग्री केवळ 'AI मधून गणपतीचे नवदर्शन' या विभागासाठी ग्राह्य राहणार आहे. अन्य विभागांमध्ये AI सामग्री स्वीकारली जाणार नाही.




स्पर्धेतील जागतिक सर्वोत्तम रीलसाठी १ लाख रुपये, तर महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील सर्वोत्तम रीलसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. विविध विभागांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. रील उभी (9:16) आणि ३० ते ९० सेकंदांची असणे आवश्यक आहे. सहभागासाठी: [www. filmcityganeshareel.com

# पुणे-ओकायामा मैत्रीचा नवा अध्याय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे आणि जपानमधील ओकायामा शहरांमधील मैत्रीपूर्ण संबंधांना २० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांनी ओकायामा प्रीफेक्चरचे राज्यपाल रुयता इबालागी यांची सदिच्छा भेट देऊन मैत्रीचा नवीन अध्याय सुरु केला. या वेळी दोन्ही शहरांमधील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक संबंध अधिक दृढ करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पुणे हे वाहन उद्योग, माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षणाचे प्रमुख केंद्र असल्याने ओकायामा येथील उद्योजकांनी पुण्यात गुंतवणूक करावी, असे आवाहन महापौर नागपुरे यांनी केले. आयुर्वेद, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, योग आणि आरोग्य क्षेत्रांत जपानी कंपन्यांनी पुण्यात संयुक्त संशोधन सुरू करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# गणेशोत्सवाच्या पोलिसांचा मोलाचा वाटा

## कोमल नवले यांच्याकडून आभार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे, वडगाव बुद्रुक आणि धायरी परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव शांततेत पार पडल्याच्या पार्श्वभूमीवर नगरसेविका सौ. कोमलताई सारंग नवले यांनी विविध पोलीस ठाणे आणि वाहतूक विभागांना भेट देत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखणे, भाविकांची सुरक्षितता, गणेश मंडळांच्या मिरवणुकांचे नियोजन आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांनी विशेष दक्षता घेतली. उत्सवाच्या काळात अहोरात्र कर्तव्य बजावत नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल नवले यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक देशमुख, नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल बोस, नांदेड सिटी वाहतूक विभागाचे इन्चार्ज पाटील तसेच सिंहगड रोड वाहतूक विभागाचे राहुल गौड व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. गणेशोत्सव शांततेत पार पडण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेले नियोजन आणि बजावलेली जबाबदारी महत्त्वपूर्ण असल्याचे कोमलताई नवले यांनी सांगितले. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सेवा देणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याला त्यांनी सलाम केला. यावेळी श्री. सारंग बाळासाहेब नवले, सौरभ नवले, आदित्य पवार, सोहम कोरपडे, यश पवार व विनायक नवले उपस्थित होते.

# अपंगत्वावर मात करत सामाजिक कार्याचा वसा

## विकास देडगे यांना 'महाराष्ट्र गौरव उत्कृष्ट सामाजिक कार्य' पुरस्कार

- २०१२-१३ पासून मतिमंद मुलांसह वृद्धांच्या सेवेत योगदान
- आळंदीत द युवा ग्रामीण पत्रकार संघातर्फे गौरव



**आळंदी (दै. आरंभ पर्व)**

शारीरिक अपंगत्वावर मात करत मतिमंद मुलांचे संगोपन आणि वृद्धांच्या सेवेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले श्री स्वामी कृपा आशीर्वाद वृद्धनिवासचे संस्थापक अध्यक्ष विकास बबन देडगे यांना 'महाराष्ट्र गौरव उत्कृष्ट सामाजिक कार्य' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने आळंदी येथे आयोजित कार्यक्रमात दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विकास देडगे हे २०१२-१३ पासून मतिमंद मुलांसाठी तसेच वृद्धाश्रमाच्या माध्यमातून निराधार वृद्धांच्या सेवेसाठी कार्यरत आहेत. स्वतःच्या शारीरिक अपंगत्वावर मात करत त्यांनी सामाजिक कार्याचा ध्यास घेतला असून, त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत त्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. समाजातील दुर्लक्षित घटकांना आधार देत त्यांच्या जीवनात मायेचा आधार निर्माण करण्याचे काम देडगे सातत्याने करीत आहेत. त्यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. स्वतःच्या मर्यादांवर मात करून समाजातील गरजूंच्या जीवनात आशेचा प्रकाश निर्माण करणाऱ्या विकास देडगे यांच्या कार्याचा हा गौरव सामाजिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# रांगोळी, पथनाट्य आणि 'वंदे मातरम्'मधून देशभक्तीची झलक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने देशभरात 'सेवा संकल्प अभियान-2026' आणि 'सेवा ही संस्कृती' उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. 'सेवा ही संस्कृती' या संकल्पनेवर आधारित या अभियानाचा उद्देश समाजात सेवा, स्वच्छता, राष्ट्रभक्ती आणि सांस्कृतिक जागृतीची भावना अधिक दृढ करणे हा आहे. हे अभियान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतीला समर्पित करण्यात आले आहे. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र (SCZCC), नागपूरच्या संचालिका श्रीमती आस्था कार्लेकर यांनी सांगितले की, या अभियानांतर्गत महाराष्ट्रासह छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि कर्नाटक येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये रांगोळी निर्मिती व प्रदर्शन, पथनाट्य तसेच राष्ट्रभक्तीपर गीत 'वंदे मातरम्'च्या सादरीकरणाचा समावेश आहे. 'सेवा ही संस्कृती' कार्यक्रमांतर्गत आर्मी पब्लिक स्कूल, देहू रोड येथील इयत्ता 11वीच्या 16 विद्यार्थ्यांनी प्रभावी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून भारतीय संस्कृती, स्वच्छता आणि सेवा भावनेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्'च्या सादरीकरणाने करण्यात आली.

# NBC Bearings कडून नव्या उत्पादन श्रेणीचे अनावरण

**ग्रेटर नोएडा (दै. आरंभ पर्व)**

नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेडचा प्रमुख ब्रँड आणि सी. के. बिर्ला समूहाचा भाग असलेल्या NBC Bearingsने bauma CONEXPO INDIA 2026मध्ये बांधकाम आणि ऑफ-हायवे उपकरणांसाठी बेअरिंग्सची नवीन उत्पादन श्रेणी सादर केली. या नव्या उत्पादनांमुळे हेवी-ड्युटी उपकरणांसाठी कंपनीची उत्पादन श्रेणी विस्तारली असून, भारतात स्थानिक पातळीवर विकसित होणाऱ्या अभियांत्रिकी घटकांची वाढती मागणी पूर्ण करण्यास मदत होणार आहे. या उत्पादनांचे अनावरण इनव्होल्युट पॉवरगिअर प्रा. लि.चे संचालक आलोक गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. बांधकाम उपकरणे आणि खाण उद्योगातील विविध अनुप्रयोगांसाठी बेअरिंगशी संबंधित उत्पादनांचा कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये विस्तार करण्यात आला आहे. नवीन उत्पादन श्रेणी उच्च भार, दीर्घकाळ सातत्यपूर्ण कार्य आणि आव्हानात्मक कामाच्या परिस्थितीचा सामना करणाऱ्या बांधकाम यंत्रसामग्रीच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहे. यामुळे बांधकाम उपकरणांच्या क्षेत्रात NBC Bearingsचा सहभाग अधिक व्यापक होण्याची अपेक्षा आहे.




> या उत्पादन श्रेणीच्या माध्यमातून कंपनीने स्थानिकीकरणावरही भर दिला आहे. भारतातच उपाय विकसित करून त्यांचे उत्पादन करण्यासोबत स्थानिक अभियांत्रिकी कौशल्य, उत्पादन क्षमता आणि तांत्रिक सहाय्याचा लाभ उपकरण उत्पादकांना देण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. bauma CONEXPO INDIA 2026मध्ये NBC Bearings आपल्या विद्यमान उत्पादनांसोबत या नव्या श्रेणीचे प्रदर्शन करत आहे. प्रदर्शनादरम्यान कंपनीची तांत्रिक टीम बांधकाम यंत्रसामग्रीतील विविध अनुप्रयोगांसाठी वेगवेगळ्या बेअरिंग संरचनांची उपयुक्तता आणि कार्यक्षमता सादर करत आहे.

या नवीन श्रेणीमध्ये बेअरिंग हाउसिंग, इंडक्शन हीटर, बेअरिंग पुलर, फिटिंग टूल्स आणि सिंगल पॉइंट स्वयंचलित वंगण प्रणाली यांचा समावेश आहे. बांधकाम उपकरणे आणि खाण उद्योगातील विविध यंत्रसामग्रीसाठी ही उत्पादने उपयुक्त ठरणार आहेत. भारतामध्ये पायाभूत सुविधा विकास, यांत्रिकीकरण आणि स्थानिक उत्पादनाला मिळणारे वाढते महत्त्व यामुळे बांधकाम उपकरणांच्या मूल्यसाखळीत नव्या संधी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर विविध कामकाजाच्या परिस्थितीत सातत्यपूर्ण कार्यक्षमता देणाऱ्या आणि अभियांत्रिकी अचूकतेवर आधारित घटकांची मागणी वाढत आहे. नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेडचे विपणन व उत्पादन व्यवस्थापन प्रमुख संजय गुप्ता म्हणाले की, बांधकाम उपकरण क्षेत्र हे कंपनीसाठी महत्त्वाचे विकास क्षेत्र आहे. नवीन उत्पादन श्रेणीच्या माध्यमातून अभियांत्रिकी, उत्पादन आणि उत्पादन-विकास क्षमतांचा विस्तार करून विविध अनुप्रयोगांसाठी सेवा देण्याची क्षमता वाढवण्यात येत आहे. स्थानिक पातळीवर विकसित उच्च दर्जाची उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी उपकरण उत्पादकांसोबत काम करण्याची मोठी संधी असल्याचे त्यांनी नमूद केले.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६





## सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयासाठी २ कोटी १० लाखांचा निधी मंजूर!

- **आमदार भीमराव तापकीर सर्व सहकारी नगरसेवक यांचेही सहकार्य; सचिन मोरे**
- **सर्व कार्यालये एकाच ठिकाणी येणार; नागरिकांची धावपळ थांबणार असल्याची प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे यांची भूमिका**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
सिंहगड रोड परिसरातील नागरिकांच्या प्रशासकीय सुविधांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या क्षेत्रीय कार्यालयाचा प्रश्न आता मार्गी लागण्याच्या दिशेने आहे. सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयासाठी तब्बल २ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे तसेच इतर नगरसेवकांच्या सामूहिक सहकार्यातून २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनीही या कामासाठी निधीची तरतूद केली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या कार्यालयासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे यांनी दिली. सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे प्रस्तावित स्थलांतर हे नागरिकांच्या दृष्टीने भौगोलिकदृष्ट्या सोयीचे ठरणार आहे. सर्व संबंधित कार्यालये एकाच ठिकाणी एकत्रित येणार असल्याने नागरिकांना विविध प्रशासकीय कामांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याची आवश्यकता भासणार नाही.

या स्थलांतरामुळे नागरिकांची गैरसोय होण्याऐवजी त्यांना अधिक सुलभ सुविधा मिळणार आहेत. त्यामुळे या निर्णयाला विरोध होण्याचे कारण नसल्याचे मत सचिन मोरे यांनी व्यक्त केले.

सध्या विविध नागरी कामांसाठी नागरिकांना महापालिकेच्या वेगवेगळ्या कार्यालयांत जावे लागते. मात्र, क्षेत्रीय कार्यालय सुरू झाल्यानंतर विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. यामुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाचण्यास मदत होणार असून, स्थानिक पातळीवर प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान होण्याची अपेक्षा आहे.

# कला-संस्कृती जोपासणाऱ्या कलाकारांच्या सदैव पाठीशी उभा राहू

### चंद्रकांत पाटील यांचे मत; ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट संस्थेच्या सिंहगड रस्त्यावर महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे उद्घाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट या संस्थेच्या अधिकृत कार्यालयाचे आज उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्रातील लावणी, लोकधारा, ऑर्केस्ट्रा, बॅकस्टेज कलाकार, नाटक, एकपात्री प्रयोग आणि चित्रपट क्षेत्रातील कलाकारांच्या पाठीशी उभी राहणारी एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. सहा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या संस्थेचे कार्यालय झाल्याने कलाकारांना हक्काची जागा मिळाली आहे. येत्या काळात ही संस्था पुण्याच्या संस्कृतीचा केंद्रबिंदू बनेल, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. कला, संस्कृती जोपासणाऱ्या कलाकारांच्या सदैव पाठीशी राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

सिंहगड रोडवरील पानमळा येथील मैथिली सभागृहाच्या आवारात ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्टच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. चंद्रकांत दादा पाटील यांनी आभासी माध्यमाद्वारे यावेळी उपस्थितांशी संवाद साधला. याप्रसंगी नगरसेविका रुपाली धावडे, नगरसेविका मंजूश्री खर्डेकर, भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते संदिप खर्डेकर, नगरसेविका वृषाली रिठे, पिंपरी-चिंचवड कलाकार महासंघाचे अध्यक्ष विजयकुमार उलपे, लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर, मैथिली स्टुडिओचे मिलिंद माळी, समुत्कर्षच्या मधुरा वैशंपायन व 'ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट'चे अध्यक्ष योगेश सुपेकर उपस्थित होते. चंद्रकांत पाटील म्हणाले, "आज व्यस्त दिनक्रमामुळे उपस्थित राहू शकलो नाही. मात्र येत्या काही दिवसांत कार्यालयाला निश्चितच भेट देणार आहे. कार्यालय असेल तर कोणतीही संघटना जोमाने काम करु शकते. कार्यालयाशिवाय संघटनेला रुप येत नाही. त्यामुळे ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्टचे हक्काचे कार्यालय होणे हा संस्थेसाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. समुत्कर्षच्या माध्यमातून आपण कलाकारांना स्वस्त दरात चांगले धान्य उपलब्ध करुन देत आहोत, येत्या काळात इतरही कोणती मदत लागली तर त्यासाठी आपण सदैव संस्थेसोबत असू." यावेळी कमी भाडे घेऊन संस्थेला कार्यालय उपलब्ध करुन दिल्याबद्दल मैथिली स्टुडिओचे मिलिंद माळी यांचे विशेष कौतुक केले. 'ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट'चे अध्यक्ष योगेश सुपेकर म्हणाले, "संस्था सुरू होऊन सहा वर्ष झाली. मात्र, संस्थेला कार्यालय नसल्याने हॉटेलमध्ये किंवा इतर कुठेतरी भेटून संस्थेचे काम करावे लागत होते. मात्र आता शहराच्या मध्यवर्ती भागात हक्काची जागा मिळाल्याने संस्था आणखी जोमाने काम करेल. मागील सहा वर्षांत संस्थेने कलाकारांना या संस्थेच्या माध्यमातून सभासदांना खाना ते दवाखाना, शासनाच्या विविध योजना, समुत्कर्ष योजनेचे कार्ड, १० लक्ष रुपयाचे अपघाती विम्याचे वाटप करण्यात आले. कलाकारांच्या कुटुंबियांना अडचणीच्या प्रसंगी मानसिक आधार व अर्थिक सहाय्य देणे, युवा आणि ज्येष्ठ कलाकारांना हक्काचा मंच उपलब्ध करून देणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे असे कार्य केले आहे. तसेच कलेच्या क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या कलावंतांचा 'कलाभूषण' किंवा 'कलादर्पण' यांसारख्या पुरस्कारांनी संस्थेमार्फत गौरव केला जातो. त्यासोबतच संस्था सामाजिक भान राखत समाजासाठीही वेळोवेळी काम करत असते."

रुपाली धावडे, मंजूश्री खर्डेकर, संदिप खर्डेकर यांनी संस्थेला शुभेच्छा देत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे प्रवक्ते अभय गोखले यांनी केले व आभार अश्विनी कुरपे यांनी मानले. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष बबलू खेडेकर, उपाध्यक्ष गणेश गायकवाड, खजिनदार रशिद शेख, उपखजिनदार राजरत्न पवार, सचिव मनोज माजिरे, उपसचिव अश्विनी कुरपे व विश्वस्त भाविका कुलकर्णी, सोमनाथ फाटके, गणेश मोरे, अमिर शेख व उषा करंबेळकर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे




### काश्मीरच्या सांस्कृतिक वारशावर पाच पुस्तके प्रकाशित

पुणे (आरंभ पर्व) : काश्मीरचा उल्लेख प्रामुख्याने राजकारण, सुरक्षा आणि समकालीन घडामोडींच्या संदर्भात होत असला, तरी या भूमीचा समृद्ध आध्यात्मिक, साहित्यिक आणि बौद्धिक वारसा तितकाच महत्त्वाचा आहे. याच वारशाचा संशोधनातून वेध घेत महाराष्ट्रातील पत्रकार, लेखिका आणि संशोधक डॉ. वैदेही तामन यांनी काश्मीरच्या सांस्कृतिक इतिहासावर पाच विशेष ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या या संशोधनामुळे लाल डेड, आचार्य अभिनवगुप्त आणि काश्मीरच्या प्राचीन परंपरांकडे नव्याने लक्ष वेधले गेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. तामन यांनी काश्मीर खोऱ्यात प्रवास करून तेथील इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान, परंपरा आणि आध्यात्मिक वारशाचा अभ्यास केला. मुख्य प्रवाहातील चर्चेत तुलनेने कमी अधोरेखित होणाऱ्या या पैलूंना त्यांनी आपल्या लेखनातून व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या ग्रंथांमध्ये "लाल डेड काश्मीरची माता", "अभिनवगुप्त – शाश्वत शिवाचा आवाज" तसेच नीलमत पुराणावरील संशोधनाचा समावेश आहे. या ग्रंथांच्या माध्यमातून काश्मीरच्या प्राचीन परंपरा, तत्त्वज्ञान, पवित्र भूगोल आणि आध्यात्मिक इतिहासाचा मागोवा घेण्यात आला आहे. काश्मीरच्या संत-कवयित्री लाल डेड यांच्या जीवनकार्यावर आधारित डॉ. तामन यांचे लेखन विशेष उल्लेखनीय ठरले आहे. त्याचबरोबर आचार्य अभिनवगुप्त यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या त्यांच्या ग्रंथातून काश्मीर शैव परंपरेतील समृद्ध विचारविश्व समोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. डॉ. तामन यांच्या मते, काश्मीरकडे केवळ वर्तमानातील घटनांच्या चौकटीतून पाहता कामा नये. काश्मीरचा प्राचीन आध्यात्मिक आणि सांस्कृतिक इतिहास पुढील पिढ्यांसाठी जतन होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने संशोधन आणि ग्रंथलेखनाच्या माध्यमातून हा वारसा दस्तावेजबद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. श्रीनगर येथे आयोजित लाल डेड साहित्य पुरस्कार सोहळ्यात, जम्मू-काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांच्या उपस्थितीत डॉ. वैदेही तामन यांच्या लाल डेड काश्मीरची माता या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. गुलशन बुक्स, काश्मीर यांनी प्रकाशित केलेल्या त्यांच्या ग्रंथांमुळे काश्मीरच्या साहित्यिक, तात्त्विक आणि आध्यात्मिक वारशावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. डिजिटल युगात माहिती वेगाने प्रसारित होत असताना ती तितक्याच वेगाने विस्मृतीत जाण्याची शक्यताही असते.

## ४१४.०८ कोटी रुपयांच्या वैयक्तिक मृत्यू दाव्यांचे निवारण

- **आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफचा दावा निवारण दर ९९.३१ टक्के**
- **चौकशी आवश्यक नसलेल्या प्रकरणांत कागदपत्रे मिळाल्यानंतर सरासरी एका दिवसात दावा निकाली**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत ९९.३१ टक्के दावा निवारण दर नोंदविला आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, अधिकृत आकडेवारीतील फॉर्म एल-३९ आणि एल-४०च्या आधारे भारतातील प्रमुख जीवन विमा कंपन्यांमध्ये हा दर सर्वाधिक असल्याचा कंपनीचा दावा आहे.

या तिमाहीत कंपनीने ४१४.०८ कोटी रुपयांच्या वैयक्तिक मृत्यू दाव्यांचे निवारण केले. तसेच, प्रमुख जीवन विमा कंपन्यांमध्ये कंपनीचे प्रति दावा सरासरी मूल्य सुमारे १५ लाख रुपये असल्याचे कंपनीने नमूद केले आहे.

कंपनीचे चीफ – अंडररायटिंग अँड रिटेल क्लेम्स सारंग गोखले यांनी सांगितले की, ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दावा प्रक्रिया सोपी, सुलभ आणि वेळेत पूर्ण करण्यावर कंपनीचा भर आहे. आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत कंपनीचा दावा निवारण दर ९९.३१ टक्के राहिला असून, चौकशीची आवश्यकता नसलेल्या प्रकरणांमध्ये अंतिम कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर दावा निकाली काढण्यासाठी सरासरी एक दिवसाचा कालावधी लागला.

डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे दावा प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान करण्यास मदत होत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. ग्राहकांना मोबाईल अर्ज, व्हॉट्सअॅप, संभाषणयंत्रणा आणि संकेतस्थळाच्या माध्यमातून दावे दाखल करण्याबरोबरच त्यांचा मागोवाही घेता येतो.

## उत्तराखंडमधील शिक्षकांना मिळणार कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण

- **एससीईआरटी उत्तराखंड आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशनमध्ये सामंजस्य करार**
- **राज्यभरातील शिक्षकांची कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता व कौशल्यवृद्धीवर भर**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
उत्तराखंड राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांनी राज्यातील शिक्षकांची कृत्रिम बुद्धिमत्ता विषयातील साक्षरता आणि कौशल्य वाढविण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीमुळे राज्यातील शिक्षकांना आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्यापन प्रक्रियेत प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि साधने उपलब्ध होणार आहेत. या कराराअंतर्गत एससीईआरटी उत्तराखंडचा माहिती-तंत्रज्ञान विभाग आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन संयुक्तपणे शिक्षकांसाठी शैक्षणिक सामग्री, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि तांत्रिक सहाय्य विकसित करणार आहेत. विकसित करण्यात येणारे अभ्यासक्रम दीक्षा, यूके ई-सृजन आणि मिशन कर्मयोगी यांसारख्या डिजिटल व्यासपीठांवर उपलब्ध करून देण्याची योजना आहे. कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या सहकार्याने उत्तराखंडमधील शिक्षकांसाठी 'एआय कोर्स फॉर एज्युकेटर्स' हा अभ्यासक्रम स्थानिक गरजांनुसार विकसित करून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. या माध्यमातून शिक्षकांना अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थपूर्ण वापर करण्याबरोबरच विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या शिकण्याच्या विविध गरजांनुसार अध्यापन करण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमामुळे धड्यांचे नियोजन, मूल्यांकन तसेच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी शिक्षकांचा आत्मविश्वास आणि क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच भविष्यातील अभ्यासक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नव्या डिजिटल अध्यापन पद्धतींचा समावेश करण्यावरही भर दिला जाणार आहे.

एससीईआरटीच्या संचालक (अकादमिक) बंदना गर्ब्याल यांनी या भागीदारीचे स्वागत करताना सांगितले की, उत्तराखंडमधील दुर्गम जिल्ह्यांतील शिक्षकांपर्यंतही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दर्जेदार शिक्षण पोहोचविण्यास या भागीदारीची मदत होईल. अधिक प्रभावी अध्यापन, विद्यार्थ्यांमधील नवोन्मेष आणि भविष्यासाठी सज्ज वर्गखोल्या निर्माण करण्याच्या दिशेने हे सहकार्य महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जयश्री रमेश यांनी सांगितले की, प्रत्येक शिक्षकाला भविष्यासाठी सज्ज साधने मिळणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला भविष्यासाठी सज्ज शिक्षक मिळणे आवश्यक आहे. एससीईआरटी उत्तराखंडसोबतच्या या सहकार्यामुळे त्यादृष्टीने पुढील कामाला सुरुवात होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# विवो इंडियाच्या राष्ट्रीय शिक्षक नवोन्मेष फेलोशिपमधील १० उत्कृष्ट शिक्षकांची घोषणा

### विवो इग्नाइट २०२६च्या राष्ट्रीय अंतिम फेरीत 'एसटीईएम' नवोन्मेषासाठी होणार सन्मान; देशभरातून २०० हून अधिक अर्जांतून निवड

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
विवो इंडिया, या नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँडने, विवो इग्नाइट २०२६ च्या चौथ्या आवृत्तीअंतर्गत १० 'टीचर इनोव्हेशन फेलो' यांची नावे जाहीर केली आहेत. हे असे शिक्षक आहेत जे पारंपरिक वर्गशिक्षणाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, प्रयोगशीलता, समस्या-निवारण आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देत आहेत. विवो इग्नाइट ४.० चा एक नवीन घटक म्हणून सुरू करण्यात आलेल्या 'नॅशनल टीचर इनोव्हेशन फेलोशिप' (NTIF) चा उद्देश, अनुभवात्मक शिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, समस्या-निवारण आणि सर्वसमावेशक वर्ग पद्धतींमध्ये शिक्षकांच्या योगदानाला मान्यता देऊन STEM शिक्षण परिसंस्थेला




बळकट करणे हा आहे.

या फेलोशिपसाठी देशभरातून २०० हून अधिक अर्ज आले होते, त्यापैकी ३० शिक्षक मुलाखतीच्या टप्प्यापर्यंत पोहोचले. कठोर छाननीनंतर, ६ राज्ये, १ केंद्रशासित प्रदेश आणि १० जिल्ह्यांमधून १० शिक्षकांची निवड करण्यात आली. या मूल्यांकनात चार क्षेत्रांचे मूल्यांकन करण्यात आले: अध्यापन पद्धतींमधील नावीन्य; सर्वसमावेशक आणि अनुकूलनशील शिक्षणशास्त्र; STEM चा वास्तविक जगावरील प्रभाव आणि उपयोजन; आणि दूरदृष्टी, नेतृत्व व व्याप्ती.

या मूल्यांकन समितीमध्ये शिक्षण, STEM आणि नावीन्य परिसंस्थांमधील नऊ तज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांचा समावेश होता, ज्यात आयआयटी मद्रास, प्रवर्तक टेक्नॉलॉजीज आणि सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन यांसारख्या संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश होता.

विवो इंडियाच्या मुख्य कॉर्पोरेट कम्युनिकेशन अधिकारी, गीता चन्नना म्हणाल्या, "विद्यार्थी नावीन्यपूर्णतेचा अनुभव कसा घेतात, हे घडवण्यात शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते; ते विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास, प्रयोग करण्यास आणि आपले शिक्षण वास्तविक जगातील आव्हानांना लागू करण्यास प्रोत्साहित करतात. नॅशनल टीचर इनोव्हेशन फेलोशिपच्या माध्यमातून, आम्ही अशा शिक्षकांना ओळखतो आणि त्यांचा गौरव करतो, जे असे शैक्षणिक वातावरण निर्माण करत आहेत आणि विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर विचार करण्यास मदत करत आहेत. या १० फेलोंची विविधता आणि त्यांनी वर्गाच्या वातावरणात विकसित केलेले वेगवेगळे दृष्टिकोन हे दर्शवतात की नावीन्य हे संसाधने किंवा भौगोलिक मर्यादांनी बांधलेले नसते. या शिक्षकांना ओळख देऊन आणि त्यांचे कौतुक करून, विवो इग्नाइटचा उद्देश अनुभवात्मक आणि सर्वसमावेशक शिक्षणाच्या सशक्त संस्कृतीमध्ये योगदान देणे, तसेच असा प्रभाव निर्माण करणे आहे, जो आणखी अनेक तरुण नवोन्मेषकांना प्रेरणा देऊ शकेल."

ते 'तुमची समस्या, तुमचे समाधान' हा कार्यक्रम चालवतात, जो कोल्ली टेकड्यांमधील आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या समाजासमोरील आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहित करतो. त्यांच्या कार्यात १०,००० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत आणि ७२ विद्यार्थी प्रकल्पांना पाठिंबा मिळाला आहे.
**- आर. चंद्रशेखरन | तामिळनाडू | विज्ञान आणि गणित**

त्यांनी 'आकाश विद्यालय - स्काय स्कूल ऑफ इंडिया' सुरू केले. या कार्यक्रमाद्वारे, ते सौर अभ्यास, लघुग्रहांचा शोध आणि उपकरणे बनवणे यांसारख्या उपक्रमांमधून खगोलशास्त्राला पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे नेत आहेत. त्यांचा हा उपक्रम ११ शाळांमधील २,००० हून अधिक विद्यार्थी आणि सामान्य जनतेपर्यंत पोहोचला आहे.
**- एस. मणी | आसाम | भौतिकशास्त्र**

ते भौतिकशास्त्र अधिक मनोरंजक आणि व्यावहारिक बनवण्यासाठी 'एनरिच द सॉईल' सारख्या व्यावहारिक आणि अनुभवात्मक पद्धती वापरतात. त्यांचे कमी खर्चाचे, २१ व्या शतकातील प्रयोग विद्यार्थ्यांना सर्जनशीलपणे विचार करण्यास आणि समस्या सोडवण्यास आव्हान देतात; ते १,००० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहेत आणि जवळपास २० प्रकल्पांना मार्गदर्शन केले आहे.
**- सी. माणिक्यम रेड्डी | तामिळनाडू | भौतिकशास्त्र**

ते 'समस्येपासून प्रोटोटाइपपर्यंत' (problem-to-prototype) हा दृष्टिकोन वापरतात, जो विद्यार्थ्यांना समस्या ओळखण्यापासून ते उपाय विकसित करण्यापर्यंतच्या नवोन्मेष चक्रातून घेऊन जातो. त्यांच्या कार्यात १०,००० विद्यार्थी आणि ५०० प्रकल्प सहभागी झाले आहेत; विद्यार्थी VEX वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि ISEF सारख्या व्यासपीठांवरही सहभागी होत आहेत.
**- नितेश कुमार | हरियाणा | एआय, रोबोटिक्स आणि आयओटी**







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.